राज्यातील पाणी तपासणी प्रयोगशाळेतील
कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन व मुदतवाढ
यामध्ये सुधारणा करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१९/प्र.क्र.६२/पा.पु.१२

गोकुळदास तेजपाल रूग्णालय आवार, ७ वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई-४०००01
दिनांक: १७ जुलै, २०१९

वाचा :-

१) **शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१४/प्रक्र.५९/पापु.१२, दि.२३ फेब्रुवारी, २०१५**
२) **शासन निर्णय क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१७/प्रक्र.४२/पापु.१२, दि.०९ मे, २०१८**
३) **शासन पत्र क्रमांकः डब्ल्युक्युएम-२०१९/प्रक्र.१२/२०१९/पापु.१२, दि.२० मे,२०१९**

प्रस्तावना:-

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल कार्यक्रमांतर्गत पाणी गुणवत्ता व सनियंत्रण कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यातील उपविभागीय, जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय प्रयोगशाळांसाठी तसेच राज्य, विभाग व जिल्हा संनियंत्रण कक्षासाठी एकूण ८१८ कंत्राटी पदे निर्माण केली आहेत. या पदावर नियुक्ती करण्याची कार्यपध्दती, कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन व इतर अटी व शर्ती याबाबत संदर्भाधीन शासन निर्णयामध्ये तरतूदी केल्या आहेत. त्यापैकी काही तरतूदींमध्ये सुधारणा करण्याबाबत दि.२३/०४/२०१९ रोजी मा.अप्पर मुख्य सचिव (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले असून संदर्भाधीन दिनांक २०/०५/२०१९ च्या पत्रान्वये या बैठकीचे इतिवृत्त निर्गमित करण्यात आले आहे. त्यानुषंगाने संदर्भाधीन दि.२३/०२/२०१५ च्या शासन निर्णायामध्ये सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यातील उपविभागीय, जिल्हास्तरीय, विभागीय व राज्यस्तरीय पाणी तपासणी प्रयोगशाळांच्या तसेच राज्य, विभाग व जिल्हा संनियंत्रण कक्षाच्या कंत्राटी मनुष्यबळाची निवड करण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भाधीन दि. २३/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये निवड समिती गठीत करण्यात आली आहे. त्यामध्ये बदल करून सदर निवड समिती मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या ऐवजी प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात येत आहे. विभागातील सर्व

जिल्हा प्रयोगशाळा, उपविभागीय प्रयोगशाळा व जिल्हा संनियंत्रण कक्षासाठी कंत्राटी मनुष्यबळाची भरती करण्याची संपूर्ण जबाबदारी प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांची असेल. कंत्राटी पद्धतीने भरावयाच्या पदांची बिंदुनामावली अद्ययावत ठेवण्याची, पदांच्या भरतीची जाहिरात देण्याची व भरती प्रक्रिया राबविण्याची संपूर्ण कार्यवाही प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा यांनी पार पाडावी.

२. कंत्राटी पध्दतीने नियुक्त केलेल्या कर्मचा-यांचे कार्य मूल्यमापन करून काम समाधानकारक आढळल्यास त्यांना तीन कार्यालयीन दिवसांचा तांत्रिक खंड देऊन पुढील ६ महिने व ५ महिने याप्रमाणे दोन टप्प्यात मुदतवाढ देण्याची तरतूद संदर्भाधीन दि. २३/०२/२०१५ च्या शासन निर्णयान्वये केली आहे. त्यामध्ये बदल करून कंत्राटी कर्मचा-याचे काम समाधानकारक आढळल्यास आता त्यांना एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन ११ महिन्यांसाठी मुदतवाढ देण्यात यावी.

३. संदर्भाधीन दिनांक ९ मे, २०१८ च्या शासन निर्णयान्वये या कंत्राटी कर्मचा-यांचे मानधन एप्रिल, २०१८ पासून सुधारित करण्यात आले आहे. तथापि त्यामध्ये वार्षिक वाढ अनुज्ञेय ठरविण्यात आलेली नाही. विहित कालावधी पूर्ण केल्यानंतर विहित पद्धतीने मुदतवाढ दिलेल्या पात्र कर्मचा-यांना आता यापूर्वी घेत असलेल्या मानधनाच्या ८ % वार्षिक मानधनवाढ दिनांक १ मे, २०१९ पासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

४. संदर्भाधीन २३ फेब्रुवारी, २०१५ व ९ मे, २०१८ च्या शासन निर्णयातील इतर तरतूदी पूर्वी प्रमाणेच लागू राहतील. याशिवाय कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या सर्व तरतूदी पाणी तपासणी प्रयोगशाळेतील व संनियंत्रण कक्षातील कंत्राटी कर्मचाऱ्यांनाही लागू राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०७१७१७१८३१५२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea42710902672 28122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a9 31b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2019.07.18 11:06:00 +05'30'

(चं.कृ.मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. विभागीय आयुक्त (सर्व)

२. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे.
३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई.
५. प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, सर्व.
६. मुख्य अभियंता, राज्यस्तरीय भारत निर्माण कक्ष, बेलापूर, नवी मुंबई.
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर.

प्रत माहितीस्तव-

१. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय यांचे खाजगी सचिव
२. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, मंत्रालय यांचे खाजगी सचिव
३. मा.अप्पर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय यांचे स्वीय सहाय्यक
४. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२
५. सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.
६. उप सचिव व प्रकल्प संचालक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. कार्या.पापु-१०/कार्या.पापु-०४/कार्या.पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती पापु-१२